**No. PL(APP)/Circular/2024/1138**

# CIRCULAR

It is hereby informed that on the line of Office Memorandum No. 57/05/2021-P&PW(B) dated 03.03.2023 issued by Department of Pension and Pensioners Welfare, Ministry of Personnel, Public Grievances and Pensions, Government of India, New Delhi, the Government of Maharashtra, Finance Department, vide Resolution dated No. Sankirna-2023/Pra.Kra.46/Seva- 4 dated 02.02.2024, Mantralaya, Mumbai has permitted to exercise one time option to those Government Servants who are appointed on or after 01.11.2005 against the posts/vacancies which were advertised/notified for recruitment /appointment prior to 01.11.2005 for making the Old Pension Scheme applicable to them.

In pursuance to the abovesaid G.R. dated 02.02.2024,the following officers/officials may exercise **ONE TIME OPTION** for coverage under Maharashtra Civil Services (Pension) Rules 1982, Maharashtra Civil Services (Commutation of Pension) Rules, 1984 and General Provident Fund Scheme and other related rules and submit the same to the Registrar (Personnel), High Court, Appellate Side, Bombay alongwith copies of relevant documents viz. Advertisement/Notification of recruitment, published Select List of High Court, Bombay and Appointment Letter/order issued to them in the relevant recruitment process, on or before **01.08.2024 :-**

..2//..

(i) those eligible officers/officials working on the establishment of High Court, Appellate Side, Bombay who are initially appointed on any post on this establishment against the posts/vacancies which were advertised/notified for recruitment /appointment, prior to the date of Government Notification dated 31.10.2005

**AND**

(ii) those eligible employees who were initially appointed on the establishment of High Court, Appellate Side, Bombay on any post on or after 31.10.2005 against a post or vacancy which was advertised/notified for recruitment/appointment prior to the date of notification i.e 31.10.2005 for DCPS and subsequently joined other Government Departments through proper channel.

The option once exercised shall be final. Officers/Officials who are eligible to exercise option in accordance with the conditions mentioned in the aforesaid resolution and have not exercised this option within stipulated period, shall continue to be covered by the Defined Contributory Pension Scheme. Option exercised after the stipulated period i.e. after 01.08.2024 shall not be entertained in any case and the concerned will be covered under New Pension Scheme. The Copy of Government Resolution dated 02.02.2024 is attached herewith for ready reference.

***Sd/-***

**(R. N. Joshi)**
**Registrar General**

**HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY, 26th February, 2024**

**दि. ०१.११.२००५ पूर्वी पदभरती जाहिरात/अधिसूचना निर्गमित झालेल्या प्रकरणी शासन सेवेत दि. ०१.११.२००५ रोजी किंवा त्यानंतर रुजू झालेल्या शासकीय अधिकारी/ कर्मचारी यांना केंद्र शासनाच्या धर्तीवर जुनी निवृत्ती वेतन योजना लागू करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक-संकिर्ण-२०२३/प्र.क्र.४६/सेवा-४,**
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२
दिनांक:- ०२ फेब्रुवारी, २०२४

**संदर्भ :** १. वित्त विभाग, शा.नि.क्र.:अंनियो-१००५/१२६/सेवा-४, दि. ३१.१०.२००५.

२. केंद्र शासनाच्या निवृत्ती वेतन व निवृत्ती वेतन धारकांचे कल्याण विभागाचे पत्र क्र.५७/०५/२०२१-पी व पीडब्ल्यू (बी), दि. ०३.०३.२०२३.

**प्रस्तावना:-**

संदर्भ क्र.१ येथील दि. ३१.१०.२००५ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्य शासनाच्या सेवेत दि. ०१.११.२००५ रोजी किंवा त्यानंतर नियुक्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांसाठी केंद्र शासनाच्या धर्तीवर नवीन अंशदान निवृत्तीवेतन योजना राज्यात लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. केंद्र शासनाने संदर्भ क्र. २ येथील दि. ०३.०३.२०२३ रोजीच्या कार्यालयीन ज्ञापनान्वये केंद्र शासनाच्या अधिकारी/कर्मचारी यांची नियुक्ती (Appointed) ज्या पदावर किंवा रिक्त जागेवर करण्यात आली आहे, ज्याची जाहिरात/भरतीची/नियुक्तीची अधिसूचना नवीन पेन्शन योजना लागू करण्याच्या अधिसूचनेच्या दिनांकापूर्वी म्हणजेच २२.१२.२००३ पूर्वी निर्गमित झाली आहे व जे दि. ०१.०१.२००४ रोजी किंवा त्यानंतर शासन सेवेत दाखल झाले व ज्यांना नवीन परिभाषित अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू झाली त्या केंद्र शासनाच्या अधिकारी/कर्मचारी यांना केंद्रीय नागरी सेवा (निवृत्ती) नियम, १९७२/२०२१ लागू करण्याचा एक वेळ पर्याय देणेबाबत (One Time Option) निर्णय घेतला आहे. सदर केंद्र शासनाच्या निर्णयाच्या धर्तीवर दि. ०१.११.२००५ पूर्वी पदभरती जाहिरात/अधिसूचना निर्गमित झालेल्या प्रकरणी राज्य शासनाच्या सेवेत दि. ०१.११.२००५ रोजी किंवा त्यानंतर रुजू झालेल्या शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना जुनी निवृत्ती वेतन योजना लागू करणेची बाब विचाराधीन होती. याबाबत मा.मंत्रीमंडळाने दि. ०४ जानेवारी, २०२४ रोजीच्या बैठकीत मंजुरी दिली असून त्यानुसार शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब विचारधीन होती. याबाबतचा शासन निर्णय खालीलप्रमाणे आहे.

**शासन निर्णय :-**

दि. ०१.११.२००५ पूर्वी पदभरती जाहिरात/अधिसूचना निर्गमित झालेल्या प्रकरणी शासन सेवेत दि. ०१.११.२००५ रोजी किंवा त्यानंतर रुजू झालेल्या शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना केंद्र शासनाच्या धर्तीवर महाराष्ट्र नागरी सेवा निवृत्तीवेतन नियम, १९८२, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण) १९८४ व सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी व अनुषंगिक नियमाच्या तरतुदी लागू करण्यासाठी एक वेळ पर्याय (One Time Option) देण्यात येत आहे.

Scanned with OKEN Scanner

२. संबंधित राज्य शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी जुनी निवृत्ती वेतन व अनुषंगिक नियम लागू करण्याचा सदर पर्याय हा सदर शासन निर्णय निर्गमित केल्याच्या दिनांकापासून ६ महिन्यांच्या कालावधीत देणे बंधनकारक राहील. जे राज्य शासकीय अधिकारी/कर्मचारी या ६ महिन्यांच्या कालावधीत जुनी निवृत्ती वेतन योजना लागू करण्याचा पर्याय देणार नाहीत, त्यांना राष्ट्रीय निवृत्ती वेतन प्रणाली (NPS) लागू राहील. राज्य शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी प्रथम दिलेला पर्याय अंतिम राहील.

३. जुनी निवृत्तीवेतन व अनुषंगिक नियम लागू करण्याचा पर्याय संबंधित राज्य शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी त्यांच्या नियुक्ती प्राधिकाऱ्याकडे सादर करावा. सदर शासन निर्णयातील तरतुदीनुसार संबंधित राज्य शासकीय अधिकारी/कर्मचारी हा जुनी निवृत्ती वेतन व अनुषंगिक नियम लागू होण्यास पात्र झाल्यास तशा पद्धतीचे कार्यालयीन ज्ञापन संबंधित नियुक्ती प्राधिकाऱ्याने पर्याय प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून दोन महिन्यांच्या आत निर्गमित करावे. तसेच संबंधित राज्य शासकीय अधिकारी/कर्मचारी यांचे राष्ट्रीय निवृत्ती वेतन प्रणाली (NPS) मधील खाते नियुक्ती प्राधिकाऱ्याने तात्काळ बंद करावे.

४. जे राज्य शासकीय अधिकारी/कर्मचारी जुनी निवृत्ती वेतन व अनुषंगिक नियम लागू करण्याचा पर्याय निवडतील त्यांचे भविष्य निर्वाह निधीचे (GPF) खाते उघडण्यात यावे व सदर खात्यात राष्ट्रीय निवृत्ती वेतन प्रणाली (NPS) च्या खात्यातील त्यांच्या हिश्श्याची रक्कम व्याजासह जमा करण्यात यावी.

५. जे राज्य शासकीय अधिकारी/कर्मचारी जुनी निवृत्ती वेतन व अनुषंगिक नियम लागू करण्याचा पर्याय निवडतील त्यांच्या राष्ट्रीय निवृत्ती वेतन प्रणाली (NPS) मधील राज्य शासनाच्या हिश्श्याची रक्कम व्याजासह राज्याच्या एकत्रित निधीत वळती करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

६. सदर शासन निर्णय मा. मंत्रीमंडळाने दि. ०४ जानेवारी, २०२४ रोजीच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०२४०२०२१८२९४५८६०५ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

MANISHA YUVRAJ KAMTE

Digitally signed by MANISHA YUVRAJ KAMTE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=FINANCE DEPARTMENT,
2.5.4.20=a7f08db3910ecf0f88c442fbde20f7b84e70dfd0bf4dcd977abab75b3fcb8508, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=11602E78DA072F96AF0EDE7966315FA5B93A2119E4A490D340E527F96DBA01D3, cn=MANISHA YUVRAJ KAMTE
Date: 2024.02.02 18:29:54 +05'30'

(मनिषा कामटे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा. उपमुख्यमंत्री (गृह) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई



Scanned with OKEN Scanner

४) मा. उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
५) मा . सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
६) मा . अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई
७) मा. विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/ विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
८) मा. उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
९) मा. उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
१०) सर्व सन्माननीय सदस्य विधानपरिषदविधानसभा /, महाराष्ट्र विधानमंडळ, मुंबई.
११) मा .मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई.
१२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव, मंत्रालय, मुंबई.
१३) मा.उप मुख्यमंत्री (गृह) यांचे अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,मंत्रालय, मुंबई.
१४) सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
१५) महालेखापाल, महाराष्ट्र- १/२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र, मुंबई / नागपूर.
१६) महालेखापाल, महाराष्ट्र- १/२ (लेखा परीक्षा), महाराष्ट्र, मुंबई /नागपूर.
१७) मंत्रालयीन विभागांचे सर्व /प्रधान सचिव/सचिव. अपर मुख्य सचिव
१८) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधान परिषद), विधान भवन, मुंबई.
१९) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय (विधान सभा), विधान भवन, मुंबई.
२०) महासंचालक, माहिती जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
२१) सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग.
२२) सह सचिव / उप सचिव / अवर सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
२३) निवड नस्ती - सेवा-४

---------



Scanned with OKEN Scanner